**ज्योतिषविषयक**

सुप्रसिद्ध राज ज्योतिष श्री अंबाजी उपासक प. बाबुभाई शास्त्री जन्मतारीख पाहुन हस्तरेषा, नोकरी, व्यापार, विवाह, संतान, गृहक्लेश, प्रेमवंश, कोर्ट, विजय, वास्तुशास्त्र, शास्त्र, धनलाभ, दारू व्यसन, मनोकामना पुर्ण होण्याची 101% गॅरंटी

**तपस्वी हॉटेल बेसमेंट, 9 इंदिरानगर जॉगिंग ट्रॅकजवळ, मुंबई - आग्रारोड, नाशिक संपर्क : ९८२२८१७९०४**

दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com

www.katusatyanews.com

DIRECT ADMISSION

MBBS | MD | MS | BDS | MDS

BAMS | BUMS | BHMS

PANCHAKARMA

DERMATOLOGY | NURSING

PHARMACY

PHYSIOTHERAPY

PARAMEDICAL | VETERINARY

OPHTHALMOLOGY | FMGE

Indo Abroad Education

9326134770

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २० वे, अंक १८२ वा | शुक्रवार, दि. २० फेब्रुवारी २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

# किल्ले शिवनेरीवर छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव जल्लोषात साजरा

**पुणे, (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवरायांनी दिलेला मार्ग हाच सर्वांगीण विकासाचा मार्ग आहे. त्यांच्या कार्याचा हा आदर्श जगासमोर ठेवण्यासाठी २०३० साली छत्रपती शिवाजी महाराजांची ४०० वी जयंती भव्य आणि जागतिक स्तरावर साजरी केली जाईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

किल्ले शिवनेरीवर आयोजित शिवजन्मोत्सव सोहळ्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार, सांस्कृतिक कार्यमंत्री ॲड. आशिष शेलार, आमदार शरद सोनवणे, माजी आमदार अतुल बेनके, कोल्हापूर परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक सुनील फुलारी, जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे, जिल्हा पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल्ल, उपवनसंरक्षक आशिष ठाकरे, अभिनेता रितेश देशमुख, मराठा सेवा संघाचे प्रदेशाध्यक्ष विजय घोगरे आदी उपस्थित होते.














छत्रपती शिवाजी महाराज नसते तर आज भारताचा इतिहास आणि भूगोलही वेगळा असता असे नमूद करून फडणवीस म्हणाले. अनेक राजे-रजवाडे मोगलांच्या आधीपत्याखाली काम करत असताना आई जिजाऊंनी घडविलेल्या छत्रपती शिवरायांनी रयतेचे स्वराज्य स्थापन करून हिंदुस्थानाला नवी दिशा दिली. छत्रपती शिवरायांनी १८ पगड जातींच्या मावळ्यांना एकत्र करून स्वराज्याची स्थापना केली. ह्यहे माझे राज्य नसून रयतेचे राज्य आहे,ह्ळ अशी भूमिका त्यांनी घेतली. देव, देश आणि धमार्साठी लढा देण्याची प्रेरणा देत त्यांनी सामान्य जनतेला मोगलांच्या जोखडातून मुक्त करण्याचे कार्य केले. त्यांच्या राज्यात समता, सन्मान, न्याय आणि स्त्रीसुरक्षा यांना प्राधान्य होते. शेतकरी समाधानी राहील, अन्याय-अत्याचार होणार नाहीत, अशी राज्यव्यवस्था त्यांनी उभी केली, असे मुख्यमंत्री म्हणाले.

राज्यकारभारात विविध सुधारणा करताना शिवाजी महाराजांनी सुमारे ५० प्रकारचे कर रद्द करून सुटसुटीत करप्रणाली निर्माण केली. पाणी, जंगल यांचे नियोजन केले. भविष्यातील धोका ओळखून समुद्रमार्गे होणाऱ्या आक्रमणांना रोखण्यासाठी जलदुर्ग उभारले. पोतुर्गीजांवर विजय मिळवून पश्चिम किनारपट्टी सुरक्षित केली. छत्रपतींच्या कारकिर्दीत समुद्रमार्गे आक्रमण करण्याची हिंमत कुणालाही झाली नाही, अशा शब्दात त्यांनी महाराजांचे द्रष्टेपण मांडले.

शिवरायांच्या पराक्रमाची साक्ष राज्यातील गड किल्ले देत असल्याचे नमूद करीत श्री. फडणवीस पुढे म्हणाले, पंतप्रधानांच्या पुढाकाराने शिवनेरीसह छत्रपती शिवाजी महाराजांचे १२ किल्ले जागतिक वारसा स्थळ म्हणून नामांकित झाले असून २७ देशांनी एकमताने त्यास मान्यता दिली आहे. सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी संबंधित प्रमाणपत्र स्वीकारले. त्यामुळे शिवरायांचे किल्ले आता अधिकृतपणे जागतिक वारसा स्थळ म्हणून गौरवले गेले आहेत. शिवरायांच्या कार्याची साक्ष असलेले राज्यातील सर्व किल्ले अतिक्रमणमुक्त करण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याचे त्यांनी सांगितले.

मराठा सेवा संघाच्या निवेदनावर राज्य सरकार सकारात्मक काम करेल, तसेच मांडण्यात आलेल्या सर्व मुद्द्यांवर विचार करण्यात येईल, अशी ग्वाही देऊन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस राज्यातील आणि जगभरातील शिवप्रेमींना शिवजयंतीच्या शुभेच्छा दिल्या.

### शिवनेरी किल्ला विचार आणि कार्याचे प्रेरणास्थळ- उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार

श्रीमती पवार म्हणाल्या, दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासाठी शिवनेरी किल्ला, ही शिवजन्मभूमी केवळ ऐतिहासिक स्थळ नव्हते, तर ते त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे प्रेरणास्थळही होते. पवित्र शिवनेरी किल्ल्याविषयी केवळ जिव्हाळाच नव्हता, तर या शिवजन्मभूमीचे सौंदर्य वाढावे, तिचा ऐतिहासिक वारसा जपला जावा आणि भावी पिढ्यांना अभिमानाने दाखवता यावा, यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. त्यांच्या पुढाकारातून 'किल्ले शिवनेरी विकास आराखडा' साकार झाला आणि या परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्यात आला.

गेल्या वर्षी युनेस्कोच्या जागतिक वारसा यादीत किल्ले शिवनेरीचा समावेश झाला आहे. त्यापूर्वीच शिवजन्मभूमी शिवनेरीसह राज्यातील गडकोटांच्या जतन-संवर्धनासाठी त्यांनी निधीची तरतूद केली होती.

केवळ शिवनेरी किल्ल्यापुरते मर्यादित न राहता, शिवजन्मभूमी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जुन्नर तालुक्याला पर्यटन तालुका म्हणून विकसित करण्याचा संकल्प त्यांनी ध्यासाने घेतला होता आणि त्या दिशेने ठोस पावले उचलली होती.

गेल्या अर्थसंकल्पात आग्रा येथे महाराजांच्या पराक्रमाची साक्ष देणारे शिवस्मारक उभारण्याचा निर्धार, पानिपत येथे मराठा शौर्य स्मारक तसेच संगमेश्वर येथील छत्रपती संभाजी महाराजांच्या स्मारकाचा समावेश आहे, असा संकल्प करण्यात आला होता.

किल्ले रायगड विकास आराखडा व स्वराज्यरक्षक छत्रपती संभाजी महाराजांचे बलिदान स्थळ तुळापूर आणि समाधी स्थळ वढू बुद्रुक येथे स्मारकाचे काम अत्यंत वेगाने सुरु असून ही सर्व कामे प्रगतीपथावर आहेत. या प्रत्येक स्मारकातून भावी पिढ्यांना प्रेरणा, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचा संदेश मिळत राहणार आहे.

छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्यातील प्रत्येक घटकाची काळजी घेण्याची शिकवण आपल्याला दिली असून त्याच विचारांवर आणि रयतेचं राज्य' या संकल्पनेवर राज्य सरकार पुढे वाटचाल करीत आहे. शिवछत्रपतींच्या स्वप्नातील सुजलाम सुफलाम, न्याय आणि समृद्ध स्वराज्य घडवण्यासोबतच यापुढेही महाराष्ट्राच्या सर्वांगिण विकासासाठी राज्य सरकार कटिबद्ध राहील, असा विश्वास श्रीमती पवार यांनी व्यक्त केला.

आमदार सोनवणे यांनी आपले विचार व्यक्त केले.

प्रारंभी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री यांच्या उपस्थितीत शिवजन्मस्थानी पारंपरिक वेशातील महिलांनी शिवरायांची महती सांगणारा पाळणा गायिला. राष्ट्रगीत तसेच 'गर्जा महाराष्ट्र माझा' या राज्यगीताची धून पोलीस बँड पथकाने वाजवून सलामी दिली. त्यानंतर पोलीस पथकाने बंदुकीच्या तीन फैरी झाडून छत्रपती शिवरायांना मानवंदना दिली. यावेळी जिल्हा परिषद शाळच्या लहान विद्यार्थ्यांच्या पथकाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनातील प्रसंग सुंदर पद्धतीने सादर केले.

त्यानंतर मुख्यमंत्री आणि उपमुख्यमंत्र्यांनी बाल शिवाजी व माँ जिजाऊंच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेची पालखी वाहीली.

यावेळी मुख्यमंत्री यांच्या हस्ते प्रगत प्रगतशील शेतकरी स्व. पंकज वामन, खारखर येथील टाटा कॅन्सर रुग्णालयाचे विभाग प्रमुख डॉ. विनोद सीताराम हांडे, लेफ्टनंट अजिंक्य मेहेर, माजी पंचायत समिती सभापती शिवाजीराव खैरे आणि उपलेफ्टनंट श्रुतिका ताथवडे यांना शिवनेर भूषण पुरस्कार प्रदान करण्यात आले.

कार्यक्रमास उपविभागीय अधिकारी गोविंद शिंदे, मराठा सेवा संघाचे पदाधिकारी यांच्यासह शिवभक्त उपस्थित होते.

### शिवरायांच्या विचारावर चालणारा बलशाली महाराष्ट्र घडवू- उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज हे युगपुरुष होते. त्यांच्या दूरदृष्टीतून उभे राहिलेले स्वराज्य आजही सुशासनाची प्रेरणा देते. शिवरायांच्या विचारांवर चालत बलशाली व स्वाभिमानी महाराष्ट्र घडविण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. महाराजांनी जलव्यवस्था, अर्थकारण व पर्यावरण रक्षणाच्या संकल्पना चारशे वर्षापूर्वीच राबवल्या. 'शिवराई' ही चलन व्यवस्था त्यांच्या दूरदृष्टीचे प्रतीक असल्याचे त्यांनी नमूद केले. राज्यातील गड-किल्ल्यांचे जतन व संवर्धन अधिक वेगाने करण्यात येईल. बाळासाहेब ठाकरे जन्मशताब्दी वर्षानिमित्त किल्ले स्वच्छता व जतन मोहीम राबविण्यात येणार आहे. शेतकऱ्यांप्रती महाराजांच्या संवेदनशील धोरणांचा उल्लेख करत बळीराजाला सक्षम करण्यासाठी सरकार कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले. स्त्रीसन्मानाची परंपरा जपत 'लाडकी बहीण' योजनेद्वारे महिलांना सक्षम करण्यात येत असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. जुन्नर तालुका व शिवनेरी किल्ला परिसराच्या विकासाला प्राधान्य देऊन प्रलंबित मागण्या मार्गी लावण्यात येतील, असे उपमुख्यमंत्री शिंदे म्हणाले.

# ३५ हजार मीटरच्या दोऱ्याच्या माध्यमातून साकारली छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त सोलापूर शहरात उत्साहाचे वातावरण असताना एका आगळ्या वेगळ्या छत्रपती शिवाजी महाराजांच्या आकर्षक प्रतिमेने सोलापूरकरांचे विशेष लक्ष वेधून घेतले आहे.

सोलापूर येथील एका प्रतिभावान चित्रकार विपुल मिरजकर याने तब्बल २२ बाय २२ फुटांची भव्य प्रतिमा केवळ दोऱ्याच्या सहाय्याने साकारली आहे.




दरम्यान, ही कलाकृती पूर्ण करण्यासाठी जवळपास ८ ते १० दिवसांचा कालावधी लागला आहे. त्यांना पाच सहकाऱ्यांची साथ लाभली असून पारंपरिक चित्रकलेपेक्षा वेगळा प्रयोग करण्याचा उद्देश होता आणि शिवप्रेमींसाठी ही कलाकृती अर्पण करण्यात आल्याचे चित्रकार विपुल मिरजकर यांनी लोकमत शी बोलताना सांगितले. शिवजन्मोत्सव मध्यवर्ती मित्र मंडळ आणि सुभाष गुरुजी पवार यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविण्यात आला. शिवजन्मोत्सवाच्या पार्श्वभूमीवर ही भव्य प्रतिमा शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे महाराजांच्या पुतळ्याजवळ लावण्यात आली आहे. त्यामुळे चौकात येणाऱ्या नागरिकांचे आणि शिवप्रेमींचे लक्ष वेधले जात असून अनेकजण या कलाकृतीसोबत छायाचित्रेही काढत आहेत.

# श्रीकृष्ण देवस्थानतर्फे मूर्ती पुनर्प्राणप्रतिष्ठापना कार्यक्रम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** जुना विडी घरकुल, सागर चौक येथील श्रीकृष्ण देवस्थानतर्फे मूर्ती पुनर्प्राणप्रतिष्ठापना, सुवर्णकळसारोहण यासह विविध कार्यक्रमांचे आयोजन 22 ते 28 फेब्रुवारी या दरम्यान करण्यात आली आहे अशी माहिती देवस्थानचे अध्यक्ष विठ्ठलदास गज्जम यांनी पत्रकार परिषदेत दिली.




यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. 22 ते 28 फेब्रुवारीपर्यंत दररोज सायंकाळी 6.30 ते रात्री 8.30 या वेळेत परमपुज्य श्री श्री श्री पराविद्या नंदगिरी माता व गोपालकृष्णागारू ब्रम्हचारी यांचे "श्रीमद् भागवतम्" या विषयावर तेलुगू प्रवचन होणार आहे. गुरुवार २६ फेब्रुवारी रोजी नवीन श्रीकृष्णसह विविध देव देवतांच्या मूर्तींची पुनर्प्राणप्रतिष्ठापना व सुवर्ण कळसारोहण कार्यक्रम होणार आहे. शनिवार २८ फेब्रुवारी रोजी श्रीकृष्ण रुक्मिणीदेवी कल्याणोत्सवम् होईल.

दररोज पहाटे ह.भ.प. राकेश अन्नम महाराज व मार्कंडेय दिंडी संस्था यांच्या नेतृत्वाखाली काकडाआरती, सकाळी ह.भ.प. श्रीनिवास द्यावनपल्ली महाराज यांच्या नेतृत्वाखाली श्रीमद्भगवद्गीता पारायण, पंडित श्रीविष्णुसुदर्शना जिल्ला गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली विविध कार्यक्रम होणार आहे.

रविवार, दि. 22 फेब्रुवारी दुपारी 12 वाजता सर्व मूर्तींची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

गुरुवार, दि. 26 फेब्रुवारी रोजी दुपारी 11.58 वाजता परमपुज्य श्री श्री श्री संपूणार्नंदगिरी स्वामी यांच्या

हस्ते मुर्ती पुनर्प्राणप्रतिष्ठापना व सुवर्ण कळसारोहण कार्यक्रम होणार आहे. शुक्रवार, दि. 27 फेब्रुवारी रोजी सकाळी 7 वाजता जलकलश व कळशाभिषेक मिरवणूक निघणार आहे.

शनिवार, दि. 28 फेब्रुवारी रोजी श्रीकृष्ण रुक्मिणीदेवी कल्याणोत्सवम् कार्यक्रम दुपारी 12 वाजता होणार आहे. यानिमित्त पहाटे सुप्रभातम् सेवा, श्रीवारी महाभिषेकम्, अलंकार व श्रृंगार दर्शन कार्यक्रम होणार आहे. सकाळी 9 वाजता प्रतानम होणार आहे. त्यानंतर दुपारी महाप्रसाद होणार आहे. या कार्यक्रमास भक्तगणांनी उपस्थित राहावे, असे आवाहन श्रीकृष्ण देवस्थानच्या पदाधिकाऱ्यांनी केली आहे.

या पत्रकार परिषदेला मंदिराचे उपाध्यक्ष भास्कर बल्ला, दत्तात्रय बिज्जा, श्रीनिवास अन्नम, गिरीश गोसकी आदी उपस्थित होते.

# भारत मुक्ती मोर्चातर्फे रविवारी नागपुरात मोर्चा

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** भारत मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय पिछडा वर्ग मोर्चा, राष्ट्रीय परिवर्तन मोर्चा व बहुजन क्रांती मोर्चा यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दि. २२ फेब्रुवारी रोजी नागपूर येथील राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या मुख्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे, अशी माहिती भारत मुक्ती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अशोक गायकवाड यांनी पत्रकार परिषदेत दिली.




दि. २६ ते ३० डिसेंबरदरम्यान ४५ वे बामसेफ व १५ वे भारत मुक्ती मोचार्चे राष्ट्रीय अधिवेशन ओडिशा राज्यातील कटक येथे वामन मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आले होते. मात्र अचानक कटक प्रशासनाने स्थानिक आर.एस.एस. व भाजपच्या कार्यकर्त्यांच्या दबावामुळे अधिवेशनाच्या सर्व परवानग्या रद्द केल्या. परिणामी अधिवेशन होऊ शकले नाही. ही कृती भारतीय संविधानाने प्रदान केलेल्या मूलभूत अधिकारांचे उघड उल्लंघन करणारी आहे. या निषेधार्थ भारत मुक्ती मोचार्चे राष्ट्रीय अध्यक्ष वामन मेश्राम यांनी चार टप्प्यात आंदोलनाची घोषणा केलेली आहे. या चौथ्या टप्प्याअंतर्गत दि. २२ फेब्रुवारी रोजी नागपूर येथे संघ मुख्यालयावर विशाल महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे.

या महामोचार्चे नेतृत्व वामन मेश्राम तसेच राष्ट्रीय पिछडा वर्ग मोचार्चे अध्यक्ष चौधरी विकास पटेल हे करणार आहेत.ही महारॅली संविधान व लोकशाहीच्या रक्षणासाठी आयोजित करण्यात आलेली आहे. ओडिशा राज्यातील कटक येथे रद्द करण्यात आलेल्या अधिवेशनास पुन्हा परवानगी द्यावी, ओबीसीसह सर्व जातीची जातिनिहाय जनगणना करण्यात यावी, भारतातील सर्व निवडणुका ईव्हीएम मशीनऐवजी बॅलेट पेपरवर घेण्यात याव्यात, संविधानाने दिलेल्या मूलभूत अधिकारांना संपूर्ण संरक्षण मिळावे. अधिवेशनाच्या तयारीसाठी संघटना, प्रतिनिधी व कार्यकर्त्यांना झालेल्या खचार्ची भरपाई करण्यात यावी. मूलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यात अपयशी ठरलेल्या ओडिशा राज्य सरकारला बरखास्त करण्यात यावे, अशा या विविध मागण्या आहेत.

या पत्रकार परिषदेला मधुकर राजगुरू, सैफन शेख, योगिता वाघमारे, योगेश शिदगणे, रमेश पाटोळे आदी उपस्थित होते.




# थोरला मंगळवेढा तालमीच्या शिवभोजन उपक्रमात २५ हजार शिवभक्तांना भोजन

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** थोरला मंगळवेढा तालमीच्यावतीने शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे आणि संकेतभाऊ पिसे यांच्यावतीने प्रतिवर्षाप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराजांच्या जयंतीनिमित्त निघणाऱ्या मिरवणुका पाहण्यासाठी ग्रामीण भागातून येणाऱ्या २५ हजार शिवभक्तांसाठी शिवभोजनाचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस आयुक्त एम. राजकुमार, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओंबासे, माजी गृहराज्य मंत्री सिद्धाराम म्हेत्रे, पोलीस उपायुक्त गौर हसन यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या मूतीर्चे पूजन करून आणि शिवरायांची आरती करून शिवभोजन उपक्रमाला सुरुवात करण्यात आली.गेल्या सात वषार्पासून हा शिवभोजन उपक्रम सुरू आहे.

सोलापूरच्या डॉल्बी बंदिवरून पोलीस आयुक्त राजकुमार आणि राजाभाऊ सरवदे यांच्यात जुगलबंदी रंगली. आता राजाभाऊ सरवदे यांनी डॉल्बी बंदीची धुरा सांभाळावी असे, राजकुमार म्हणताच एकच हशा पिकला. तर न्यायालयाचा आदर ठेऊन मिरवणूक काढू अशी ग्वाही, राजाभाऊ सरवदे यांनी यावेळी सर्वांसमक्ष दिली.



यावेळी नगरसेवक चेतन नरोटे, अनंत जाधव, गौतम कसबे, नगरसेविका सौ. मनोरमा सपाटे, महापालिका उपायुक्त विना पवार, जन्मेयराजे भोसले, अमोलराजे भोसले, शिवसेनेचे शहराध्यक्ष सचिन चव्हाण, राजाभाऊ सरवदे, संकेत पिसे, समीर लोंढे, राम गायकवाड,सागर पिसे,प्रताप चव्हाण, ज्ञानेश्वर सपाटे, सुरेश फलमारी, विजय पुकाळे, राजन जाधव, हरिभाऊ जाधव, जितेश कुलकर्णी, मनसेचे जिल्हाप्रमुख विनायक महिंद्रकर,संतोष बडवे, रवी मोहिते,आदी मान्यवर उपस्थित होते.

### काय म्हणाले, नेते... डॉल्बीला फाटा, पारंपारिक वाद्याला प्राधान्य :

सोलापूरचे पोलीस आयुक्त एम. राजकुमार यांनी डॉल्बी बंद करून पारंपारिक पद्धतीने मिरवणुका सुरू केल्या असून हाच पायंडा कायम राहणार असल्याने सोलापूरचे चित्र भविष्यात चित्र बदलून जाणार असल्याचे माजी गृहराज्यमंत्री सिद्धाराम म्हेत्रे यांनी सांगितले.

डॉल्बी बंद केल्याबद्धल नगरसेवक चेतन नरोटे यांनीसुद्धा आभार मानले. राजाभाऊ सरवदे म्हणाले सोलापुरात २७५ दिवस जयंती व पुण्यतिथीचे कार्यक्रम होतात.सोलापूरला एकेकाळी दंगलीचे शहर म्हणून ओळखले जायचे,आज मात्र सोलापूर शांततेचे शहर म्हणून ओळखले जात आहे.सर्वांनी एकोपा केल्याने हे शक्य झाले आहेत. डॉल्बीला फाटा देऊन शिवभोजनाचा उपक्रम स्थूत्य असल्याचे सरवदे म्हणाले. पोलीस आयुक्त राजकुमार म्हणाले, लोकसहभाग असेल तर काहीही शक्य होऊ शकते, हे आपण सोलापुरातून शिकलो आहोत. डॉल्बी बंदीचे सर्व क्रेडिट सोलापूरकर जनतेचे आहे. सोलापुरातील सर्व जनतेची नजर राजाभाऊ सरवदे यांच्याकडे आहे, असे राजकुमार म्हणताच एकच हशा पिकला. न्यायालयाच्या निर्णयाचा आदर ठेऊ असे सरवदे म्हणाले.

### अखेरच्या क्षणापर्यंत उपक्रम सुरू राहणार

५ हजार शिवभक्तांच्या शिवभोजनापासून सुरू झालेला उपक्रम आज २५ हजार शिवभक्तांच्या शिवभोजनापर्यंत पोहोचला आहे. राजकारणात असेन नसेन पण अखेरच्या क्षणापर्यंत हा शिवभोजन उपक्रम सुरू राहील,अशी ग्वाही शिवसेनेचे जिल्हाप्रमुख अमोलबापू शिंदे यांनी दिली.

राजकारण व निवडणुका संपल्या असून आता यापुढे सोलापूरच्या विकासासाठी आपण एकत्र येऊन जोमाने कामाला लावूयात असेही ते म्हणाले.

## संपादकीय

# भारतीय शेतीची चिंता

विकास मेश्रामभारत आणि अमेरिका यांच्यातील प्रस्तावित व्यापार करारावरून देशभरात तीव्र चिंता व्यक्त केली जात आहे. हा करार भारतीय शेती, ग्रामीण अर्थव्यवस्था, लोकशाही प्रक्रिया आणि जागतिक राजकारण यांच्याशी थेट संबंधित आहे. भारत–अमेरिका व्यापार कराराच्या प्रारूपानंतर अनेक शेतकरी संघटनांनी चिंता व्यक्त केली आहे. शेतकऱ्यांच्या चिंता केवळ सोयाबीन तेल, धान्य किंवा सफरचंदावरील आयात शुल्क सवलतीपुरत्या मर्यादित नाहीत. या चिंता विश्वास, पारदर्शकता आणि भारतीय शेतीच्या भवितव्याशी संबंधित आहेत. सरकारकडून वारंवार आश्वासन दिले जात आहे की, शेती आणि दुग्ध उद्योग संरक्षित राहतील; परंतु कराराच्या मजकुरात अनेक कृषी आणि अन्नपदार्थांवरील शुल्क कमी करण्याची आणि गैरशुल्क अडथळे हटवण्याची तरतूद असल्याचे सांगितले जात असल्यामुळे शेतकऱ्यांमध्ये अस्वस्थता वाढली आहे.

याआधी युरोपियन युनियन आणि न्यूझीलंडसोबत झालेल्या मुक्त व्यापार करारांमुळे स्वस्त आयात मोठ्या प्रमाणावर वाढली आणि त्याचा फटका स्थानिक उत्पादकांना बसला. मुक्त व्यापार करारांचा इतिहास पाहिला तर, ते अनेकदा जागतिक व्यापाराच्या विस्तारासाठी महत्त्वाचे साधन ठरले आहेत. जागतिक व्यापार संघटना (डब्ल्यूटीओ) स्थापनेनंतर टॅरिफ कमी करणे, बाजारपेठा खुल्या करणे आणि बहुपक्षीय व्यापार व्यवस्था निर्माण करणे हे जागतिक धोरण बनले.

परंतु जागतिक दक्षिणेकडील अनेक देशांचा अनुभव असा आहे की मुक्त व्यापार करारांचा लाभ मोठ्या बहुराष्ट्रीय कंपन्या, निर्यातदार आणि प्रगत अर्थव्यवस्था यांना मिळतो, तर लहान शेतकरी, स्थानिक उद्योग आणि असंघटित कामगार वर्गावर त्याचा विपरीत परिणाम होतो. एफएओ आणि यूएनसीटीएच्या अभ्यासानुसार, अनेक विकासशील देशांमध्ये कृषी बाजार खुला केल्यानंतर ग्रामीण उत्पन्नातील असमानता वाढली आणि लहान शेतर्कयांचे स्थिर उत्पन्न घटले. सफरचंद उद्योगाचे उदाहरण विशेष उल्लेखनीय आहे.

हिमाचल प्रदेश, जम्मू–काश्मीर आणि उत्तराखंडमध्ये सफरचंद हे केवळ पीक नसून संपूर्ण पर्वतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. अमेरिकन सफरचंदांवरील आयात शुल्क कमी झाल्यास आणि किमान आयात मूल्य वाढवल्यास हे सफरचंद भारतीय प्रीमियम सफरचंदांच्या किमतीत बाजारात उपलब्ध होतील. परिणामी, भारतीय ग्राहक समान किमतीत अधिक दर्जेदार आयातीत सफरचंदांना पसंती देतील आणि स्थानिक उत्पादकांचा बाजार हिस्सा घटेल. कोल्ड स्टोरेजमध्ये सफरचंद साठवणे तोट्याचे ठरू शकते आणि स्थानिक उद्योग संकटात सापडू शकतो.

सोयाबीन आणि धान्याच्या बाबतीतही अशीच परिस्थिती आहे. भारतात सोयाबीन उत्पादन प्रामुख्याने लहान आणि सीमांत शेतकऱ्यांद्वारे होते. एक एकर जमिनीत साधारणतः 1 मेट्रिक टन सोयाबीन उत्पादन होते, तर अमेरिकेत जीएम सोयाबीनच्या माध्यमातून 3 मेट्रिक टनपर्यंत उत्पादन होते. ही उत्पादकतेची दरी भारतीय शेतकऱ्यांसाठी असमान स्पर्धा निर्माण करते.

त्यातच अमेरिकन शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणावर सरकारी सबसिडी मिळते. अमेरिकन शेतर्कयांना दरवर्षी सरासरी 66 हजार डॉलर इतकी सबसिडी मिळते आणि 2026 साठी 12 अब्ज डॉलरचा विशेष सहाय्य कार्यक्रम प्रस्तावित आहे. याच्या तुलनेत भारतीय शेतर्कयांना मिळणारी मदत मर्यादित आहे आणि अनेकदा एमएसपीपेक्षा 30 ते 40 टक्के कमी दरात उत्पादन विकावे लागते. अशा परिस्थितीत मुक्त व्यापार म्हणजे असमान मैदानावर खेळण्यासारखे आहे.

हा करार केवळ आर्थिक नसून राजकीयही आहे.

अमेरिकेत मध्यावधी निवडणुका जवळ आल्या आहेत आणि कृषी क्षेत्र हा अमेरिकन राजकारणातील प्रभावी घटक आहे. चीनसोबतच्या व्यापार युद्धामुळे अमेरिकन शेतर्कयांना मोठे नुकसान झाले आणि निर्यात बाजार घटला. त्यामुळे ट्रम्प प्रशासनाला नवीन बाजारपेठांची गरज आहे. भारत हा 140 कोटी लोकसंख्येचा विशाल बाजार असल्यामुळे अमेरिकेसाठी अत्यंत आकर्षक आहे. त्यामुळे भारताशी व्यापार करार हा अमेरिकन राजकीय रणनीतीचा महत्त्वाचा भाग मानला जातो. ग्रामीण अमेरिकेतील असंतोष कमी करणे आणि शेतकरी लॉबीला संतुष्ट करणे हे ट्रम्प प्रशासनासाठी राजकीयदृष्ट्या आवश्यक आहे.

या कराराचा सर्वात गंभीर पैलू म्हणजे पारदर्शकतेचा अभाव. शेतकरी संघटना, विरोधी पक्ष आणि काही राज्य सरकारांनी कराराचा संपूर्ण तपशील संसदेसमोर सादर करण्याची मागणी केली आहे. व्यापार करारांचा परिणाम देशांतर्गत कायद्यांइतकाच गंभीर असतो. कारण, ते लाखो लोकांच्या उपजीविकेवर परिणाम करतात. त्यामुळे संसदीय चर्चा, सार्वजनिक सल्लामसलत आणि प्रभाव मूल्यांकन आवश्यक आहे. लोकशाही प्रक्रियेशिवाय मोठ्या धोरणात्मक निर्णयांची अंमलबजावणी केल्यास लोकांचा विश्वास ढासळतो आणि सामाजिक असंतोष वाढतो.

भारतीय शेती आधीच अनेक संकटांशी झुंज देत आहे. कर्जबाजारीपणा, हवामान बदल, वाढते उत्पादन खर्च, बाजारातील अस्थिरता आणि धोरणात्मक अनिश्चितता यामुळे शेतकरी त्रस्त आहेत. आर्थिक सहयोग व विकास संघटना ओईसीडीच्या अहवालानुसार 2000 ते 2025 या कालावधीत भारतीय शेतकऱ्यांना 111 लाख कोटी रुपयांचे नुकसान झाले आहे. अशा परिस्थितीत स्वस्त आयातीत उत्पादनांची लाट आली तर स्थानिक बाजार कोसळण्याची शक्यता आहे.

कापूस आयातीवरील शुल्क कमी केल्यानंतर देशांतर्गत किमती घसरल्याचे उदाहरण आहे, ज्यामुळे शेतर्कयांना मोठा फटका बसला. अन्नपदार्थांची आयात म्हणजे ग्रामीण रोजगाराची घट आणि बेरोजगारीत वाढ, असे अर्थशास्त्रज्ञांचे मत आहे. भारतासाठी शेती हा केवळ आर्थिक उत्पादनाचे क्षेत्र नाही, तर तो ग्रामीण रोजगाराचा मुख्य स्रोत, सामाजिक स्थैर्याचा आधारस्तंभ आणि अन्नसुरक्षेचा कणा आहे. भारतात सुमारे 45 टक्क्यांहून अधिक लोकसंख्या थेट किंवा अप्रत्यक्षपणे शेतीवर अवलंबून आहे. ग्रामीण भारतात शेती आणि संबंधित क्षेत्रे मिळून सुमारे 18 टक्के योगदान देतात; परंतु रोजगारातील वाटा याहून अधिक आहे. त्यामुळे शेतीवर परिणाम करणारा कोणताही व्यापार करार हा केवळ आर्थिक नव्हे, तर सामाजिक आणि राजकीय निर्णय ठरतो.

भारतीय आणि अमेरिकन शेतकऱ्यांमधील सर्वात मोठा फरक म्हणजे अनुदान आणि पायाभूत सुविधा. अमेरिकेत कृषी उत्पादनावर मोठ्या प्रमाणावर सरकारी सहाय्य दिले जाते. कृषी संसाधन व्यवस्थापन सर्वेक्षण 2020 नुसार, एका अमेरिकन शेतकऱ्याला सरासरी 66,314 डॉलर वार्षिक अनुदान मिळते. याशिवाय, अमेरिकन प्रशासनाने 2026 मध्ये 12 अब्ज डॉलरचे अतिरिक्त सहाय्य जाहीर केले आहे. यामुळे अमेरिकन शेतकरी बाजारातील चढ–उतारांपासून संरक्षण मिळवतात आणि कमी किमतीतही उत्पादन विकू शकतात.

याउलट, भारतीय शेतर्कयांना मर्यादित अनुदान, अपुरी सिंचन सुविधा, कमकुवत साठवणूक व्यवस्था आणि बाजारातील अस्थिरता यांचा सामना करावा लागतो. भारतातील लहान शेतर्कयांचे उत्पन्न इतर देशांच्या शेतकऱ्यांच्या तुलनेत 10 ते 15 पट कमी आहे. किमान आधारभाव (एमएसपी) अनेकदा बाजारात प्रत्यक्षात मिळत नाही आणि अनेक पिकांसाठी एमएसपीपेक्षा 30 ते 40 टक्के कमी दर मिळतो. अशा परिस्थितीत अनुदानित अमेरिकन उत्पादनांशी स्पर्धा करणे भारतीय शेतर्कयांसाठी अत्यंत अवघड आहे. या करारामुळे जीएम पिकांचा प्रश्नही महत्त्वाचा ठरतो. अमेरिकन शेती मोठ्या प्रमाणावर जीएम पिकांवर आधारित आहे. भारतात जीएम पिकांबाबत सामाजिक, पर्यावरणीय आणि आरोग्यविषयक चिंता आहेत. मुक्त व्यापारामुळे जीएम अन्नपदार्थांचा प्रवेश सुलभ झाल्यास अन्न सार्वभौमत्वाचा प्रश्न निर्माण होतो. अन्न सार्वभौमत्व म्हणजे देशाला स्वतःच्या अन्न प्रणालीवर नियंत्रण असणे.

जर भारताचा अन्न बाजार बहुराष्ट्रीय कंपन्या आणि विदेशी उत्पादकांच्या ताब्यात गेला, तर देशाची अन्न सुरक्षा आणि ग्रामीण स्वायत्तता धोक्यात येईल. जागतिक पातळीवर हा करार नव्या व्यापार व्यवस्थेचा भाग म्हणून पाहिला जात आहे. ट्रम्प प्रशासनाचा व्यापार धोरणांचा कल दबाव आणि शक्तीच्या वापरावर आधारित आहे.

# जयघोषापेक्षा विचारांचा जागर !...

एकविसाव्या शतकात लोकांना महाराजांबद्दल काय वाटते याकडे न पाहता सतराव्या शतकात वर्तमानात लोकांना महाराजांबद्दल काय वाटत होते? हे आज जाणून घेणं जास्त महत्त्वाचं वाटते. हिंदी रिंग्वेंटन राजापूरम वरून महाराजांना लिहितोय तुमच्या शत्रुविरुद्ध तुम्हाला मदत करीन, तसेच महाराजांना The General of Hindu Forces असे म्हणतो. फ्रेंच प्रवासी बे कॅरीया शिवाजी महाराजांच्या अडचणी जेव्हा वाढतात तेव्हा त्यांचा उत्साह देखील वाढतो मग अशक्यप्राय कामे ते सहज साध्य करतात. पहिले शिवचरित्र लिहिणारा पोर्तुगीज प्रवासी कोसमी द ग्वार्द. महाराजांच्या दक्षिणेचे दिग्विजय मोहिमेचे बारकावे सांगणारा फ्रेंच अधिकारी मार्टिन. रायगड किल्ल्याचे अभेद्य गुणवैशिष्ट्ये सांगणारा इंग्रज व्यापारी थॉमस आणि सिंधू नदीपासून बंगालच्या प्रांतापर्यंत राज्य विस्ताराचे महत्वकांक्षा सांगणारा कॅरी. हाती धरून मृत्यूला तिरडीवरती निजण्याची... महंत भाग्य हे भाळी ऐसे नीती लिहून गेली जणू मथुरेतल्या कृष्णा जागी ती जगदंबा अवतरली.... महाराजांना पालखीत बसवताना शिवा काशीद आपल्या सहकार्यांने म्हणतो चिंता माझी सोडा सारे... हृदयावरती पत्थर ठेवा एकच मागणे तुम्हा माझे लाखांचा पोशिंदा जगवा.. महाराजांबद्दल किती व काय सांगावे.

आज 350 वर्षांहून अधिक काळ लोटून गेला, तरीही सर्वसामान्य रयतेच्या मनामध्ये शिवाजी राजे अधिराज्य करीत आहेत. असं त्यांचं काय वेगळेपण होतं? किंवा आहे. की आधुनिक लोकशाहीमध्ये पण शिवाजी महाराजांचं कौतुक, उदोउदो होत आहे. त्या 'राजा' च्या विचारात, व्यवहारात आणि चरित्रात असे काय आहे की त्यामुळे लोकशाहीत सुद्धा त्यांचे स्मरण कायम स्फूर्तिदायक ठरत आहे. तसे राजे खूप होऊन गेले परंतु सर्वच राजांची आठवण किंवा जयंती साजरी केली जात नाही पण शिवजयंती जितक्या विस्तृत प्रदेशात, जितक्या मोठ्या प्रमाणात आणि ज्या उत्साहाने, उमेदीने व स्फूर्तीने साजरी केली जाते तसे इतर कोणत्याही राजाच्या बाबतीत घडत नाही, असे का व्हावे? याचा विचार केला पाहिजे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे वारस हक्काने राजे बनले नव्हते. त्यांनी राज्य 'निर्माण' केले आणि तेही रयतेचे राज्य. राज्यात राहणाऱ्या सर्वसामान्य माणसाला 'रयतेला' आपले राज्य वाटत होते हेच ठळक वेगळेपण महाराजांचं होतं. शिवाजी महाराजांचे कार्य हे आपले कार्य आहे असे रयतेला वाटत होते. मोगल व आदिलशाहीने उध्वस्त झालेली गावे, शेतकरी शिवाजीराजांनी कौलनामे घेऊन पुन्हा बसवली. जमीन कसायला येणाऱ्यांना बी बियाणे देऊन मदत केली महसूल सुद्धा माफ केला. शेतकऱ्याच्या भाजीच्या देठालाही हात लावता कामा नये, असे सैन्याला सक्त आदेश देणारा राजा. शेतकऱ्यांची व त्यांच्या शेतीची काळजी वाहणाऱ्या राजासंबंधी रयतेला मग प्रेम का नाही वाटणार? शिवाजींचे कार्य टिकले पाहिजे व वाढले पाहिजे असे का नाही वाटणार? त्या काळात स्त्रियांच्या अब्रूला विशेषता गोरगरिबांच्या स्त्रियांच्या अब्रूला किंमत नव्हती. केवळ उपभोगण्याच्या वस्तू होत्या. दिवसाढवळ्या कधीही अब्रू लुटली जात होती. शिवाजी महाराज आणि रांझ्याच्या पाटलांची गोष्ट सर्वांनाच माहीत आहे. अशा इतरही कथा आहेत विजयी सेनापती सकुजी गायकवाड यांचे डोळे काढून जन्मभर तुरूंगात डांबले होते कारण बेळवाडीच्या किल्लेदार सावित्रीबाई देसाई या शत्रू असलेल्या स्त्रीवर बलात्कार केला म्हणून पण गय केली नाही. त्यानंतर स्त्रिया वरील अत्याचार थांबून परस्त्रीला मातेसमान मानू लागले. पण आज वारसा सांगणारी आणि महाराजांच्या नावाचा जयघोष करणारे काय करतात? अत्याचार करणाऱ्याला शिक्षा होते का? हातपाय तोडायचे सोडा, कोर्टात केस तरी दाखल होते का? आत्याचार करणारा जितका मोठा, मालदार तितका तो लवकर सुटतो.

ज्या काळात गुलामांचाही व्यापार सर्रास होत होता तिथं व्यापार उद्योगास पाठबळ कसे मिळेल. रयत, व्यापारी यांना लुबाडले जात होते. महाराजांनी अशा लोकांवर जरब घालून व्यापार उद्योगास संरक्षण दिले. महाराज धर्मश्रद्ध होते पण धर्मद्वेष्टा नव्हते. महाराजांची युद्धे ही कधीच धर्मयुद्ध नव्हते. सर्व धर्माची, सर्व जातीची लोकं महाराजांनी जोडली. थोडक्यात चारी वर्ण आपापल्या धर्माप्रमाणे चालवून त्यांचा संग्रह करून ठेवला. धर्म, धर्मनिष्ठा मुख्य नव्हती तर राज्य, राज्यनिष्ठा व स्वामीनिष्ठ मुख्य होती. महाराजांनी स्वतःच्या राज्यात प्रजेच्या धर्मावरून भेद, पक्षपातीपणा कधीच केला नाही. अस्पृश्यता, जात, धर्म, स्त्रीयांची गुलामी इत्यादींना स्वराज्यातून हद्दपार केले. शिवाजी महाराजांनी लोकभाषेत म्हणजे मराठीमधून आपला राज्यकारभार केला. महाराजांसाठी लोक मरण्यासाठी तयार झाले. काही लोकांनी शिवचरित्र हे अफजलखान, शाहिस्तेखान, दिलेरखान, औरंगजेबाच्या कैदेतून सुटका किंवा कथा, कादंबऱ्या, नाटकं, सिनेमांच्या माध्यमातून लोकांसमोर ठेवून थिटे करण्याचा प्रयत्न केला. परंतु कॉम्रेड गोविंद पानसरे आपल्या 'शिवाजी कोण होता' या पुस्तकात म्हणतात की, शिवाजीच्या राज्यासाठी लोक मरण्यासाठी तयार का झाले? याचे उत्तर ज्याला कळलं त्यालाच शिवचरित्र समजलं.

आज धर्माधर्माचे, जातीपातीच्या राजकारणामुळे जे शिवाजी महाराज देशाचे, महाराष्ट्राचे होते ते मात्र अनेक संघटना, पक्षाच्या माध्यमातून फक्त महाराष्ट्रातील हिंदूंचे केले. स्वतःच्या स्वाथार्साठी महाराजांचा उपयोग करून घेत आहेत. आज सर्व राजकीय पक्ष, पुढारी महाराजांचे स्मारक सागरात बांधण्यासाठी हजारो कोटी खर्च करायची भाषा बोलतात. वर्षोनुवर्षे त्या गोष्टीवर राजकारण चालू आहे. हे रयतेला कधी कळणार. लक्षात ठेवा इस्टेटच्या लोभाने जे लढतात आणि मरतात त्यांची नोंद ठेवावी असं इतिहासाला वाटत नाही. काहीही झालं, कितीही इतिहासाची तोडमोड केली तरी शिवाजी महाराजांचे विचार जिवंतच राहतील. "जय भवानी जय शिवाजी" अशी घोषणा कानांवर पडल्याबरोबर आपल्या हृदयाची स्पंदने आनंदाने आणि अभिमानाने उत्तेजित होतात. महाराजांनी हाती तलवार घेतली, पण निष्पापांच्या रक्ताने ती कधी रंगू दिली नाही. त्यामुळे त्यांच्या रणनीतीला रक्ताचा वास येत नाही तर मानवतेचा सुगंध येतो. ते आई भवानीला कौल मागण्याइतके धार्मिक जसे होते, तसेच पोतुर्गीजांना किल्लेबांधणीचे अन इंग्रजांना बंदुका अन तोफा चालवण्याचे तंत्र विचारणारे व्यवहारी अन आधुनिकही होते. प्रजेचा सांभाळ पित्याप्रमाणे करणारे कनवाळू पिता होते, तसेच बंडखोर–फितुरांना देहदंडाची शिक्षा देणारे कर्तव्यकठोर, न्यायनिष्ठुर राजाही होते. शिवछत्रपती हे माणूस होते की नियतीला पडलेले पूर्णत्वाचे स्वप्न होते. अनेक देशांना, देशातील लोकांना वेगवेगळ्या प्रदेशात घडलेल्या घटना, वेगवेगळी माणसं या सर्वांची प्रेरणा एकच छत्रपती शिवाजी महाराज. आज साडेतीनशे वर्षे झाली त्या प्रेरणेचा स्त्रोत चिरंतन आजही तसाच जळतोय....

**प्रा. काटकर तात्यासाहेब शिवाजी**
९२२६१४४८३६, अकलूज
(महाराष्ट्र शासनाचा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक असून शैक्षणिक व सामाजिक विषयावर लेखन करतात)

# अक्कलकोटमध्ये शिवरायांच्या पुतळ्याची प्राणप्रतिष्ठापना व पाळणा कार्यक्रम संपन्न

**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त):–** जय भवानी...! जय शिवराय...!! च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या वतीने जुना राजवाडा समोरील शामियाना मंडपात मंगलमय वातावरणात व मोठ्या दिमाखदार आणि उत्साहात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूढ पुतळ्याची प्राणप्रतिष्ठापना व शिवरायांचा पाळणा कार्यक्रम गुरुवारी २ हजार महिलांच्या उपस्थितीत संपन्न झाला. जय भवानी...! जय शिवराय...!! च्या घोषणानी आसमंत दुमदुमला होता. आकर्षक शामियाना मंडप, विद्युत रोषणाई, नयनरम्य फटाक्यांची आतिषबाजीने परिसर फुलून गेलेला होता.

दरम्यान गुरुवारी सकाळी ११ वा. श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आधारस्तंभ जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे व अन्नछत्र मंडळाचे कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे जनमेजयराजे भोसले, युवक मंडळाचे मार्गदर्शक सुरेशचंद्र सूर्यवंशी, अन्नछत्र मंडळाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, उत्सव अध्यक्ष आकाश शिंदे, उपाध्यक्ष योगेश पवार व पदाधिकारी यांच्या हस्ते अन्नछत्र मंडळात छत्रपती शिवाजी महाराजांच्या सिंहासनारूढ पुतळ्याचे पूजन करून मिरवणुकीने जुना राजवाडा समोरील शामियाना मंडपात मूर्ती स्थापन करण्यात आले. या प्रसंगी पुरोहित सोमकांत कुलकर्णी यांच्या मंत्र पठणाने विधीवत पूजन करण्यात आले.

सायंकाळी ६ वा. प्रतिष्ठापना व पाळणा कार्यक्रम जुना राजवाडा समोरील शामियाना मंडपात छत्रपती शिवरायांच्या सिंहासनारूढ पुतळ्याची प्रतिष्ठापना हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थाच्या संस्थापिका अध्यक्षा व श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळाच्या विश्वस्ता– अलकाताई जनमेजयराजे भोसले, सचिवा– अर्पिताराजे अमोलराजे भोसले, नगराध्यक्षा मैंदर्गी– अंजली बाजारमठ, माजी नगराध्यक्षा– अनिता खोबरे, हिरकणी महिला बहु. संस्था सदस्या– सरोजनी मोरे, उपाध्यक्षा– रत्नमाला मचाले, जि.प. सदस्या– शिवानी स्वामी, नगरसेविका– सोनाली शिंदे, प्रमिला देशमुख, पंचायत समिती सदस्या– आशा इंगळे, नगरसेविका– अपर्णा सिद्धे, कु. तेजस्विनीराजे अमोलराजे भोसले, कु. स्वामीनीराजे अमोलराजे भोसले, नगरसेविका– भागुबाई कुंभार, नगरसेविका– सुनंदा स्वामी, नगरसेविका– रेणुका राठोड, नगरसेविका– शैला स्वामी, कस्तुरा चौगुले, अमृता शिंदे, सरिता कुर्ले, स्नेहा खवळे, जहीराबी शेख, अल्फिया कोरबू, नगरसेविका मैंदर्गी सपना मोरे



**२१ फेब्रुवारी रोजी भव्य मिरवणूक :**

शनिवारी दि. २१ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ६ वा. विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शहरातील प्रमुख मार्गावरून छत्रपती शिवाजी महाराजांची भव्य मिरवणूक निघणार असल्याचे उत्सव अध्यक्ष आकाश शिंदे यांनी सांगितले.

श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळ आणि महाराष्ट्र बहुजन मध्यवर्ती शिवजन्मोत्सव युवक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आधारस्तंभ जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले, श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थानाचे अध्यक्ष महेश इंगळे व मंडळाचे मार्गदर्शक सुरेशचंद्र सूर्यवंशी, शामराव मोरे, बाबासाहेब निंबाळकर यांच्या मार्गदर्शनाखाली व अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली संयोजक अमोलराजे भोसले मित्र मंडळ यांच्या वतीने शिवजन्मोत्सव – २०२६ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

मल्लम्मा पसारे, संध्याराणी हिप्परगी, सौ. शहा, लक्ष्मी अचलेर समस्त सदस्या हिरकणी महिला बहुउद्देशीय संस्थेच्या स्मिता कदम, पल्लवी कदम, संगिता भोसले, स्वाती निकम, उज्वला भोसले, कविता वाकडे, कविता भोसले, रूपा पवार, क्रांती वाकडे, छाया पवार, जयश्री माने, प्रांजली घाटगे, स्वप्ना माने, तृप्ती बाबर, आशा कदम, ज्योती कदम, कल्पना मोरे, धनश्री पाटील, श्रुती मोरे, दिव्या मोरे, अनिता साळुंखे, ज्योती शिंदे, गौरी शिंदे, उज्वला शिंदे, दिपाली हत्ते, सिमा फुटाणे, सुवर्णा घाटगे, लता मोरे, कोमल क्षीरसागर, सुवर्णा साखरे, सुजाता भीमपूरे, सूनयना मोरे, संगीता राठोड, रेखा पाटील, प्रांजली घाडगे, सुवर्णा कदम यांच्यासह तालुक्यातील वळसंग, शिरवळ, कुरनूर, वागदरी, काळेगाव, चुंगी येथील महिला मंडळासह सखी ग्रुप, वीरशैव महिला मंडळ, जिजाऊ सखी मंच यांच्यासह शहरातील विविध महिला मंडळ भगिनींच्या हस्ते आणि पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी महिला मान्यवरांचा सत्कार सोहळा संपन्न झाला. या प्रसंगी मुख्य पुरोहित अप्पू पुजारी व सोमकांत कुलकर्णी यांच्या मंत्र पठणाने विधीवत पूजन करण्यात आले.

यावेळी सागर हिप्परगी, सोपानराव गोंडाळ, कु. हर्षवर्धनराजे अमोलराजे भोसले, रामचंद्रराव घाटगे, गणेश भोसले, मल्लिनाथ करपे, प्रा.भीमराव साठे, प्रा. सायबण्णा जाधव, प्रा.मनोज जगताप, शिवराज स्वामी, किरण जाधव, अनिल टोणपे, सिद्धेश्वर जाधव, विराज माणिकशेट्टी, संजय बडवे, बालाजी जाधव, श्रीशैल कुंभार, दिपक जरीपटके, दत्तात्रय बाबर, रुद्रय्या स्वामी, सातय्या स्वामी, सुनील खवळे, सायबण्णा हरवाळकर, ॲड. अनिल पाटील, पप्पू कोल्हे, चेतन जाधव, संतोष जाधव, सुनील पवार, सागर गोंडाळ, गोविंदराव शिंदे, रमेश शिंदे, महादेव बिराजदार, अश्पाकभाई कझी, किरण पाटील, बाळासाहेब घाटगे, रवी कदम, शिवा मंगरुळे, लक्ष्मण विभूते, चंद्रकांत कुंभार, ज्ञानेश्वर भोसले, संतोष माने, समर्थ घाटगे, शरद भोसले, सुराज्य घाडगे, किरण साठे, युवराज सोनटक्के, महांतेश स्वामी, धनंजय निंबाळकर, शुभम चव्हाण, विठ्ठल रेड्डी यांच्यासह अमोलराजे भोसले लेझीम संघाचे सदस्य व युवक कार्यकर्ते बहुसंख्याने उपस्थित होते. यावेळी तीन चिमुकल्या कलाकारांनी नृत्य सदर केले व नागपूर येथील कलाकारांनी शिवगाथा गायली. या प्रसंगी कलाकारांना जनमेजयराजे विजयसिंहराजे भोसले यांच्या कडून बक्षीस देण्यात आले. दरम्यान अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या शिवस्मारक, शिवसृष्टी, श्री स्वामी समर्थ वाटिका, आश्रयदाते कक्षातील छत्रपतींच्या पुतळ्यांचे पूजन करण्यात आले. सूत्रसंचालन प्रा.प्रकाश सुरवसे यांनी केले. श्री कमलाराजे चौकातील शिवजन्मोत्सव मंडळाच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्राणप्रतिष्ठापना व पूजन आधारस्तंभ अमोलराजे जनमेजयराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले.

याप्रसंगी शिवजन्मोत्सव अध्यक्ष – आकाश शिंदे, उपाध्यक्ष – योगेश पवार, सचिव– सुमित घाटगे, श्रीधर गुरव, खजिनदार – शितल फुटाणे–जाधव तर कार्याध्यक्ष –विशाल कलबुर्गी, राजू पवार, फहिम पिरजादे, आकाश सूर्यवंशी मिरवणूक प्रमुख– संतोष भोसले, बाळासाहेब पोळ, प्रवीण घाडगे, निखील पाटील, गोटू माने, सनी सोनटक्के, सागर सोमवंशी लेझीम संघ व्यवस्थापक– वैभव मोरे, योगेश पवार, प्रथमेश पवार, मंगेश सूर्यवंशी, अमित घाटगे शिवजयंती स्टेज व मिरवणूक ट्रॉली सजावट प्रमुख– राहुल मोरे, वैभव कामनुरकर, समर्थ घाटगे, अनंत क्षीरसागर व्यवस्थापक– मनोज निकम, राजाभाऊ नवले, नितीन शिंदे, सौरभ मोरे, रोहित खोबरे, संजय गोंडाळ सत्कार प्रमुख– अशिष हुंबे, प्रशांत कडबगावकर प्रसिद्धी प्रमुख– प्रशांत भगरे, प्रवीण देशमुख, सोमशेखर जमशेट्टी, शंभूलिंग अकतनाळ, मिडिया प्रमुख अतिश पवार यांच्यासह आदिजन उपस्थित होते.

# राजराजेश्वरी प्राथमिक शाळेत शिवजयंती उत्साहात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** विनायक नगर येथील राजराजेश्वरी बालक मंदिर प्राथमिक शाळेत शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. प्रथम छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेच्या मुख्याध्यापिका वैशाली कुंभार, ज्येष्ठ शिक्षक बजरंग शिरसट, सांस्कृतीक विभाग प्रमुख वैशाली गुजर यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी इयत्ता पाचवी ब वगार्तील श्रावणी सोन्नद व नंदिनी कुंभार यांनी



पोवाडा सादर केले. त्यानंतर इयत्ता सहावीतील विद्यार्थिनींनी 'जय जय शिवराय' या गाण्यावर नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

लक्ष्मी अंणकल व सिद्धाराम पारे या विद्यार्थ्यांनी व सहशिक्षक एम.एस. बिराजदार यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवन कार्याविषयी माहिती सांगितले. यावेळी शाळेतील शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेतर कर्मचारी वृंद उपस्थित होते.

## धकाधकीच्या जीवनात पत्रकारांनी आरोग्याची काळजी घ्यावी – डॉ.अश्विनी पाटील

# मराठी पत्रकार संघाच्या वतीने मोफत हृदयरोग तपासणी शिबिर संपन्न

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):–** सध्याच्या धकाधकीच्या जीवनात पत्रकारांनी आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे, कामाचा ताण असला तरी योग्य आहार आणि व्यायाम यामुळे आरोग्य सुरक्षित ठेवता येते असे प्रतिपादन पोलीस आयुक्त डॉ. अश्विनी पाटील यांनी केले

महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ, सोलापूर आणि एसीएस हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने सोलापूर जिल्ह्यातील सर्व पत्रकार व त्यांच्या कुटुंबासाठी लोकशाही अण्णाभाऊ साठे चौक येथील एसीएस हॉस्पिटल येथे मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी

पोलीस उपायुक्त डॉ. अश्विनी पाटील, ज्येष्ठ संपादक राकेश टोळ्ये, व्यंकटेश पटवारी, प्रशांत माने, संजय पाठक, पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष मनीष केत आणि श्रमिक पत्रकार संघाचे अध्यक्ष विक्रम खेलबुडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती



शिवाजी महाराजांच्या पुतळ्यास अभिवादन करून व मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने करण्यात आली. पुढे बोलताना डॉ. पाटील म्हणाल्या पत्रकारांच्या धावपळीच्या जीवनशैलीत आरोग्याकडे दुर्लक्ष होते. कामाचा ताण असतानाही आरोग्य सुरक्षित ठेवायचे असेल योग्य आहार आणि व्यायामाची गरज आहे. त्याचबरोबर नियमित आरोग्य तपासणी करणे गरजेचे आहे. ACS हॉस्पिटलने सुरू केलेला हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्या म्हणाल्या. यावेळी राकेश टोळ्ये, मनीष केत, डॉ. सिद्धांत गांधी यांनीही मार्गदर्शन केले.

Acs हॉस्पिटलचे नामांकित हृदयरोग तज्ज्ञ डॉ. सिद्धांत गांधी, डॉ. दीपक गायकवाड, डॉ. प्रमोद पवार, डॉ. राहुल कारीमुंगी, डॉ. स्नेहल पवार आणि डॉ. ऋचा गांधी यांनी रुग्णांची तपासणी करून मार्गदर्शन केले.

या शिबिरात प्रामुख्याने बीपी, शुगर, ईसीजी, २डी इको, स्ट्रेस टेस्ट आणि स्ट्रेस इको या तपासण्या मोफत करण्यात आल्या. या शिबिरास पत्रकार आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष अभिषेक आदेप्पा यांनी, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौरभ वाघमारे यांनी तर आभार प्रदर्शन डॉ. प्रमोद पवार यांनी मानले.

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारात सक्षम राष्ट्र निर्मितीची क्षमता - मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** छत्रपती शिवाजी महाराजांनी प्रचंड शौर्य दाखवून स्वराज्याची निर्मिती केली. स्वराज्य निर्मितीत सर्व जाती धमार्तील लोकांना सोबत घेतले. या स्वराज्यात सर्व जाती धमार्तील गोरगरीब लोकांच्या विकासाला महत्त्व होते. आजच्या आधुनिक जगातही महाराजांचे विचार तेवढेच प्रभावी असून त्यांच्या विचारात सक्षम राष्ट्र निर्मितीची क्षमता असल्याचे प्रतिपादन मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले.



छत्रपती शिवाजी महाराजांच्या 396 व्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालय सोलापूर व जिल्हा क्रीडा युवक संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते, याप्रसंगी पदयात्रेच्या शुभारंभ कार्यक्रमात ते मार्गदर्शन करत होते. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, उपजिल्हाधिकारी संतोष देशमुख, प्रांताधिकारी सदाशिव पडदुणे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रशासन स्मिता पाटील, शिक्षणाधिकारी सचिन जगताप, उपमुख्य कार्यकारी अधिकारी ग्रामपंचायत सूर्यकांत भुजबळ साहेब, जिल्हा परिषदेच्या वित्त व लेखाधिकारी श्रीमती मिनाक्षी वाकडे, तहसीलदार नदाफ शेख आदि अधिकारी व कर्मचारी तसेच नागरिक विद्यार्थी उपस्थित होते.

मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम पुढे म्हणाले की, छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा आपण सर्वांनी अंगीकार केला पाहिजे. विद्यार्थ्यांना शालेय किंबहुना लहानपणापासूनच छत्रपती शिवाजी महाराजांच्या शौर्यगाथा तसेच विचारांचे बाळकडू देण्यासाठी प्रयत्न झाले पाहिजेत. महाराजांचे विचार सर्व जाती धर्मातील लोकांच्या सर्वांगीण विकासाची प्रेरणा देतात तसेच राष्ट्राला पुढे नेण्याची क्षमता ठेवतात, असे त्यांनी सांगितले.

यावेळी साईनाथ रुद्रके यांनी शिवचरित्रावर दिलेल्या व्याख्यानातून शिवाजी महाराजांचा संपूर्ण इतिहास समोर उभा ठाकला.

प्रारंभी सकाळी सात वाजता मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम, निवासी उपजिल्हाधिकारी अभिजित पाटील यांनी पार्क चौक येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर व चार हुतात्मा यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला. त्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी जंगम यांनी हिरवा झेंडा दाखवून पदयात्रेचा शुभारंभ केला.

या पदयात्रेमध्ये महाविद्यालयीन विद्यार्थी तसेच माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांचा सहभाग होता, पदयात्रा पार्क चौक ते छत्रपती शिवाजी महाराज उद्यान रंगभवन चौक दरम्यान आयोजित करण्यात आली होती. या पदयात्रेमध्ये पोलीस बँड पथक, हरीभाई देवकरण प्रशाला एनसीसी, मॉडर्न हायस्कूल, सेवासदन हायस्कूल, दमानी विद्यामंदिर, श्री स्वामीनारायण गुरुकुल, एस व्ही सी एस हायस्कूल, सिद्धेश्वर वुमन्स इंजिनिअरिंग कॉलेज, सिंहगड इंजिनिअरिंग कॉलेज, इत्यादी शाळा व महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला. पद यात्रेच्या सुरुवातीला पारंपारिक युद्ध कला कौशल्य, कवायत विद्यार्थ्यांनी सादर केली. तसेच ढोल ताशांच्या गजरात पदयात्रा मार्गस्थ करण्यात आली.

छत्रपती शिवाजी महाराज उद्यान याठिकाणी पदयात्रा पोहोचल्यानंतर येतील छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यास उपमुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांच्यासह सर्व उपस्थित अधिकाऱ्यांनी पुष्पहार अर्पण केला. तर यावेळी छत्रपती शिवाजी प्रशालेतील विद्यार्थिनींनी शिवजन्मोत्सव गीताच्या गायनातून लक्ष वेधून घेतले. त्यानंतर राष्ट्रगीत व राज्य गीताचे गायन होऊन कार्यक्रम संपन्न झाला.

# 'काठावर बसून आमच्या दुःखाची झळ कळणार नाही' रोहित पवारांचा विखे पाटील यांना सडेतोड प्रत्युत्तर

**मुंबई (कटूसत्य वृत्त) :-** राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या २८ जानेवारी रोजी झालेल्या विमान अपघाती निधनानंतर राजकीय वातावरण तापले असतानाच, आता आरोप-प्रत्यारोपांना नवे वळण मिळाले आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी रोहित पवारांवर 'अपघाताचं राजकारण करत आहेत' असा आरोप केला होता. त्यावर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आमदार रोहित पवार यांनी भावनिक आणि सडेतोड शब्दांत प्रत्युत्तर दिले आहे. विखे पाटील म्हणाले होते की, अजित पवार यांच्या अपघातप्रकरणी काही जण राजकारण करत आहेत आणि लोकांचा बुद्धिभेद करत आहेत. 'ही घटना दुर्दैवी आहे. सरणावर पोळी भाजण्याचा प्रकार थांबवावा. कुटुंबावर दुःखाचा आघात झाला असताना आरोप-प्रत्यारोप योग्य नाहीत,' असा सल्लाही त्यांनी रोहित पवारांना दिला होता.





तसेच, या प्रकरणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी DGCA ला पत्र लिहून चौकशीबाबत पावले उचलली असल्याचेही त्यांनी नमूद केले.

विखे पाटील यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रिया देताना रोहित पवार म्हणाले, 'ज्येष्ठ नेत्यांनी केलेलं विधान अत्यंत क्लेशदायक, आश्चर्यकारक आणि बेजबाबदार आहे. अजितदादांसारखा प्रसंग कुणाच्याही कुटुंबावर ओढवू नये. वेदना काय असते, ती ज्याचं जळतं त्यालाच कळते.'

'मी अजितदादांच्या अपघाताविषयी राजकारणाचा 'र' शब्दही उच्चारलेला नाही. उलट, अपघाताच्या चौकशीबाबत प्रश्न उपस्थित केले आहेत. मग विखे पाटील साहेब हा विषय राजकारणाशी जोडून चौकशीला वेगळं वळण देण्याचा प्रयत्न करत आहेत का?' असा सवाल त्यांनी केला.

'काठावर बसून आमच्या दुःखाची धग कळणार नाही. त्यामुळे किमान या विषयाला वेगळे फाटे तरी फोडू नयेत,' अशी विनंती त्यांनी केली.

२८ जानेवारी रोजी सकाळी बारामती येथे प्रचारासाठी जात असताना अजित पवार यांच्या विमानाचे क्रॅश लँडिंग झाले. या अपघातात त्यांच्यासह पाच जणांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण महाराष्ट्र हळहळला.

अपघातानंतर रोहित पवार यांनी दोन पत्रकार परिषदांद्वारे विमान अपघातातील तांत्रिक बाबी, चौकशीचा वेग आणि काही संशयास्पद मुद्द्यांवर प्रश्न उपस्थित केले आहेत.

दरम्यान, 'अजितदादांच्या मृत्यूबाबत घातपाताचा मुद्दा मांडला की भाजप नेत्यांना राग का येतो?' असा प्रश्न सोशल मीडियावर चर्चेत आहे. काही पोस्ट्समध्ये भाजपच्या नेत्यांचा या प्रकरणाशी संबंध असल्याचे दावेही करण्यात येत आहेत. मात्र या दाव्यांना अधिकृत दुजोरा नाही.

एकीकडे रोहित पवार चौकशीबाबत पारदर्शकतेची मागणी करत आहेत, तर दुसरीकडे भाजप नेते त्यांना राजकारण टाळण्याचा सल्ला देत आहेत. त्यामुळे दुःखद घटनेवरून सुरू झालेली चर्चा आता राजकीय संघर्षात परिवर्तित होताना दिसत आहे.

दरम्यान, अपघाताच्या चौकशीचा अधिकृत अहवाल येईपर्यंत आरोप-प्रत्यारोपांचा सिलसिला सुरूच राहण्याची शक्यता आहे.

# सिंहगड केगाव कॅम्पसमध्ये छत्रपती शिवाजी महाराज जयंती उत्साहात साजरी

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज तसेच एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव येथे दिनांक १९ फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती मोठ्या उत्साहात व भक्तीभावाने साजरी करण्यात आली.




सिंहगड पब्लिक स्कूल व ज्युनिअर कॉलेज येथे आयोजित कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले शिक्षण प्रसारक मंडळचे सहसचिव व सिंहगड इन्स्टिट्यूट केगाव, सोलापूरचे कॅम्पस डायरेक्टर संजय नवले यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली.

यावेळी शाळेच्या प्राचार्या शाहीन शेख, उपप्राचार्य प्रकाश नवले, शिक्षकवृंद व विद्यार्थ्यांनी महाराजांच्या प्रतिमेस अभिवादन करून त्यांच्या शौर्य, धैर्य, पराक्रम व आदर्श राज्यकारभाराचा गौरव केला. याप्रसंगी मनोगत व्यक्त करताना संजय नवले सर म्हणाले की, 'छत्रपती शिवाजी महाराजांचे विचार व कार्य आजच्या पिढीसाठी सदैव प्रेरणादायी असून त्यांच्या आदर्शांवर चालणे हीच त्यांना खरी मानवंदना आहे.'

याच अनुषंगाने एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालयातही शिवजयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास माजी कुलगुरू तथा सिंहगड सीआरटीडीचे संशोधन संचालक प्रा. एस. एच. पवार, सिंहगडचे प्राचार्य डॉ. शंकर नवले, प्रा. माणिक शिंदे, ग्रंथपाल जी. एस. गोघले, विद्यानंद बाबर यांच्यासह विद्यार्थी व कर्मचारीवर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

दोन्ही संस्थांमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचा जागर करत त्यांचा आदर्श जीवनात अंगीकारण्याचा संकल्प करण्यात आला.

# सहकार महर्षि साखर कारखान्याच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती साजरी

**अकलूज (कटूसत्य वृत्त):-** सहकार महर्षि शंकरराव मोहिते-पाटील सहकारी साखर कारखान्याच्या वतीने हिंदवी स्वराज्याचे संस्थापक 'श्री छत्रपती शिवाजी महाराज" यांच्या ३९६ व्या जयंतीनिमित्त गुरूवार दिनांक १९/०२/२०२६ रोजी सकाळी ८:३० वाजता श्री शिवपार्वती देवालय, शंकरनगर येथील छत्रपतींच्या अश्वारूढ पुतळ्याचे विधिवत पूजन करून पुष्पहार अर्पण करणेचा सोहळा कारखान्याच्या संचालिका कु. स्वरूपाराणी जयसिंह मोहिते-पाटील व सयाजीराजे संग्रामसिंह मोहिते-पाटील, संचालक तथा नगरसेवक, अकलूज नगरपरिषद, अकलूज यांचे शुभहस्ते मोठ्या उत्साहात संपन्न झाला.



सहकार महर्षि कारखान्याचे मार्गदर्शक संचालक विजयसिंह शंकरराव मोहिते-पाटील, माजी उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तसेच कारखान्याचे चेअरमन जयसिंह शंकरराव मोहिते-पाटील यांचे नेतृत्वाखाली दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज यांचे जयंतीनिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते.

सदर कार्यक्रमास कारखान्याचे व्हाईस चेअरमन शंकरराव माने-देशमुख, संचालक लक्ष्मण शिंदे, विराज निंबाळकर, रामचंद्र ठवरे व शिवसृष्टी किल्ला व शिवछत्रपती मल्टिमेडीया लेजर शो कमिटी संचालक पांडूरंग एकतपुरे, बाळासाहेब माने-देशमुख, दत्तात्रय चव्हाण, धनंजय सावंत, नामदेव चव्हाण, धनंजय दुपडे, अनिलराव कोकाटे, सौ. हर्षाली निंबाळकर, माजी संचालक भिमराव काळे, भारत फुले, शिवाजीराव सिद, बाळासाहेब पवार, मोहनराव लोंढे, धनंजय चव्हाण तसेच कार्यकारी संचालक राजेंद्र चौगुले व खातेप्रमुख, अधिकारी, पत्रकार, कार्यलक्षी संचालक, जयवंत माने-देशमुख तसेच सर्व कामगार व नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# परिपूर्ण तयारीसह विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने परीक्षेस सामोरे जावे- राजेंद्र गुंड

**माढा (कटूसत्य वृत्त):-** शालेय विद्यार्थ्यांच्या दृष्टीने 10 वीची बोर्ड परीक्षा हा आयुष्यातील एक महत्त्वाचा व निर्णायक टप्पा आहे. स्पर्धेच्या युगात उच्च ध्येय गाठणे हे जरी आव्हानात्मक असले तरी ते गाठण्यासाठी सुरुवातीपासूनच क्रमिक पुस्तके व इतर पूरक दर्जेदार साहित्याचे शिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली वाचन करून लेखनाचा भरपूर सराव करावा. अभ्यासात एकाग्रता व स्मरणशक्ती वाढावी यासाठी दररोज व्यायाम, योगासने व विविध मैदानी खेळावेत. आरोग्य निरोगी राहण्यासाठी संतुलित, पौष्टिक व सकस आहार घ्यावा. मनात परीक्षेची अनावश्यक भिती न बाळगता पूर्ण तयारीनिशी परीक्षेस आत्मविश्वासाने सामोरे गेल्यास यश हमखास मिळते असे प्रतिपादन विठ्ठलवाडीचे आदर्श शिक्षक राजेंद्र गुंड यांनी केले.



ते वाकाव ता.माढा येथील श्री संत माणकोजी महाराज प्रशालेतील इयत्ता 10 वीच्या विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभाच्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. प्रास्ताविक मुख्याध्यापक औदुंबर शेंडगे यांनी केले.

पुढे मार्गदर्शन करताना राजेंद्र गुंड यांनी सांगितले की, सध्याचे युग आधुनिक तंत्रज्ञान व मोबाईलचे आहे तेंव्हा त्याचा वापर गरजेनुसार करावा. आयुष्यात चांगले मित्र व माणसे जोडली पाहिजेत. परीक्षेच्या वेळी स्वतःवर विश्वास ठेवून निर्धारित वेळेत पूर्ण पेपर सोडवावा. वाईट विचारी व व्यसनी लोकांपासून कायमचे दूर रहावे. शिक्षक व आई-वडीलांनी दिलेले ज्ञान, माहिती, तंत्रज्ञान, कौशल्य व संस्कार आयुष्यभर जपावेत. त्या शिदोरीच्या जोरावर प्रयत्नांची पराकाष्ठा करून आयुष्याचे उच्च ध्येय गाठावे. जीवनात कितीही मोठे झालात तरी आई-वडीलांना कधीच विसरू नका असे आवाहन त्यांनी केले. यावेळी प्रशालेतील इयत्ता 10 वीचे विद्यार्थी साक्षी पवार व विराज पवार आणि वर्गशिक्षक सौदागर गव्हाणे, मदन डोईफोडे यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी संस्थेचे अध्यक्ष रणजित बोधले, माजी सरपंच शिवाजी भोगे, मुख्याध्यापक औदुंबर शेंडगे, कवयित्री सई लोंढे, सौदागर गव्हाणे, दादा भोगे, प्रविणकुमार बोधले, मदन डोईफोडे, राजन बरबडे, अमोल पारडे, संजय लोंढे यांच्यासह शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

# प्रशासकीय इमारतीत श्री छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त अभिवादन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त):-** सोलापूर महानगरपालिकेच्या शिवजन्मोत्सव मंडळ, सर्व अधिकारी व कर्मचारी वृंद यांच्या वतीने प्रशासकीय इमारतीत श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंती दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.



या प्रसंगी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस सोलापूर महानगरपालिकेचे महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. संपूर्ण परिसरात शिवमय वातावरण निर्माण झाले होते.

कार्यक्रमास उपमहापौर ज्ञानेश्वरी ताई देवकर, शिवव्याख्याते शिवरत्न शेटे, सभागृह नेते नरेंद्र काळे, गटनेते अमोल बापू शिंदे, मध्यवर्ती अध्यक्ष अर्जुन सलगर, आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त वीणा पवार, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे, नगरसेवक विनोद भोसले, नगरसेवक बिज्जू प्रधाने, नगरसेवक गौतम कसबे, नगरसेविका चाकोते, नगरसेवक अजय पोंनम, नगरसेवक सत्यनारायण गुर्रम, नगरसेवक व्यंकटेश कोंडी, मनीष केत यांच्यासह

शिवजन्मोत्सव संस्थापक अध्यक्ष माऊली पवार, शिवजन्मोत्सव समितीचे २०२६ चे अध्यक्ष प्रभुलिंग पुजारी, मेघराज साळुंखे, सोहन माने, सौरभ सांगवे, देविदास मोहिते, श्रीनिवास रामगल, भारत रोडगे, युवराज गाडेकर, दिलीप देशमुख, श्रीकांत घोलप, अमृत हावळे तसेच इतर सदस्य व अधिकारी-कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी शिवव्याख्याते शिवरत्न शेटे यांनी श्री छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जीवनकार्याविषयी, स्वराज्य स्थापनेतील त्यांचे अद्वितीय योगदान, शौर्य, दूरदृष्टी आणि आदर्श शासनव्यवस्था याविषयी सविस्तर माहिती दिली. त्यांनी महाराजांचे विचार आत्मसात करून समाजहितासाठी कार्य करण्याचे आवाहन केले.

कार्यक्रमादरम्यान मान्यवरांच्या हस्ते पारंपरिक लेझीम खेळाचे उद्घाटन करण्यात आले. लेझीमच्या तालावर वातावरण दणाणून गेले आणि उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.


## Classified - छोटी जाहीरात

**निर्मल व्यसनमुक्ती केंद्र**

**मानसिक आजार, व्यसनमुक्ती, लैंगिक समस्या** स्किझोफ्रेनिया, बायपोलार मुड डिसऑर्डर, उन्माद, डिप्रेशन, ओ. सी. डी, मंत्रचळेपणा इ. मानसिक आजारासाठी, दारू, तंबाखु, सिगारेट, गुटखा, मावा, गांजा, भांग, मिश्री इ. व्यसनमुक्तीसाठी, शीघ्रपतन, नंपुसकता, वीर्यनाश, हस्तमैथुनामुळे कमजोरी इ. लैंगिक समस्यांसाठी वृद्ध लोकांना सांभाळण्यासाठी सुश्रुषा केंद्र व नातेवाईकांशिवाय अॅडमीट करण्याची सोय **निर्मल व्यसनमुक्ती पुनर्वसन व सुश्रुषा केंद्र, स्टेशन रोड, मिरज.**

-: संपर्क :-
**8083608083**
**9922646566**
**8698732109**

**बोअरवेल**

**सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे** २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
**9420766666**

(सरकार मान्य)
**अथर्व पेस्ट कंट्रोल**
An ISO 9001-15 **सर्टीफाईड कंपनी**
**प्रोप्रा. हरी सुभाष विरपे**
**9822964815**
**9421984815**
**झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण**

**पाहिजेत**

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

**वर-वधू**




**जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र**

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

**आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.**
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
**उमेश माने**
मो. 9353370779
**रेखा बर्वे**
मो. 7218370779


**वाचकांसाठी निवेदनः** या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

## कटूसत्य शब्दकोडे



**उभे शब्द :** १) आमदार या सभागृहासाठी जनतेतून निवडून दिले जातात २) श्वसनेंद्रिय ३) बारीक खडी, चक उलट लिहा ४) राशीचक्रातील एक रास ५) लहान डोंगर ६) एक म्हण-** वसे ते स्वप्नी दिसे ७) एक अभिनेता-*** दामले ८) दारू (हिंदीत) ११) धरणग्रस्त आंदोलनाच्या नेत्या-** पाटकर १३) घर (हिंदीत) १४) स्त्रियांनी कपाळभर लावलेले कुंकू १५) उन्हाळ्यात पिले जाणारे एक दुग्धपेय १७) कोकणातील एक प्रख्यात तालुका १८) महानगरपालिकेवर वॉर्डमधून निवडून जाणारा लोकप्रतिनिधी २२) दहा गुणिले नऊ २४) नशीब (हिंदीत) २५) हात, हस्त, टॅक्स (मराठीत) २७) कष्टाची सवय असणारा २८) फटाक्यांची माळ २९) वाळवलेली खजूर ३१) एक रास ३३) खोडकर (हिंदीत) ३५) दैत्य, राक्षस ३६) याच्यापासून ताक बनवितात ३८) रावणाची बहीण ३९) प्रश्न (हिंदीत) ४०) वेग ४१) स्त्रिया केसात बांधतात ती फुलांची माळ ४२) पक्ष्याचे पंख (हिंदीत) ४३) लोभ, स्वार्थ ४४) बंदूक (इंग्रजीत) ४६) दहा (हिंदीत)

**आडवे शब्द :** १) शिवसंग्राम संघटनेचे संस्थापक
६) भारतातील एक राज्य
९) भीती, दरारा १०) स्पर्धेमध्ये विजेत्या संघास दिला जाणारा कप
१२) मंद प्रकाश (इंग्रजीत) १४) स्वार्थ, हेतू
१६) मनाची तृप्तावस्था, मुलाचे एक नाव
१९) लहान बाळाच्या डोळ्यात घालतात ते २०) कपाळ
२१) श्रीगणेशाचे एक नाव २३) तव उलट लिहा
२६) एक म्हण-हाजीर तो *** २७) खर्चात केलेली बचत
२९) एक म्हण-** तशी माती
३०) कोकण किंवा समुद्रालगतचे हवामान
३२) पतीचा भाऊ ३३) लग्नातील वधू मुलगी ३४) कसयुक्त, सत्व अर्क असलेली
३७) बेळगाव या राज्यात आहे ३८) धाडसी, पराक्रमी
३९) स्वाक्षरी ४०) बोलबाला, बोभाटा
४२) सूर्य उगवण्यापूर्वीचा उषःकाल
४४) गणेशोत्सवात आपण याची प्रतिष्ठापना करतो ४५) गतीने, वेगात
४७) वर उलट लिहा ४८) पगार (हिंदीत)

## सुडोकु - 181

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 6 | | 3 | | 8 | 1 | | |
| 5 | 8 | 1 | | | 9 | 6 | | |
| | | 3 | 5 | | | | | |
| | 9 | | 8 | | 2 | | | |
| | | | 7 | 4 | 5 | 9 | 3 | 6 |
| 3 | 5 | | | | 6 | 8 | | 4 |
| 1 | 3 | 5 | | | | | | |
| 7 | | 8 | 6 | 1 | 3 | 4 | | |
| 9 | 4 | | | | 7 | 3 | | |

# लक्ष्मी-आनंद विद्यामंदिरमध्ये शिवचरित्रातून शिवजन्मोत्सव सोहळा उत्साहात संपन्न

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** श्री माऊली शिक्षण संस्थेमध्ये दरवर्षीप्रमाणे यंदाही छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवजन्मोत्सव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी मान्यवरांच्या शुभहस्ते महाराजांच्या पूणार्कृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात सनराईज प्री-प्राइमरी सेक्शनमधील चिमुकल्यांनी छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती



संभाजी महाराज आणि राजमाता जिजाऊ यांच्या वेशभूषा साकारून उपस्थितांची मने जिंकली. यावेळी चिमुकल्यांनी आपली मनोगतेही सादर केली.

लक्ष्मी-आनंद विद्यामंदिर व ज्युनिअर कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी शिवचरित्रावर आधारित गीतगायन, पोवाडा, भाषण, शिवगर्जना अशा विविध कलाप्रकारांचे उत्कृष्ट सादरीकरण केले. कार्यक्रमाचे मुख्य आकर्षण म्हणून शिवव्याख्याते प्रा. ओम इंगळे सर यांचे शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित व्याख्यान संपन्न झाले. 'शिवाजी महाराजांच्या विचारांप्रमाणे आचरण करण्याची गरज विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झाली पाहिजे,' असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले.

हा शिवजन्मोत्सव सोहळा संस्थेचे अध्यक्ष योगेश बोबडे व सचिव सुरजा बोबडे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झाला. कार्यक्रमास प्रशालेचे प्राचार्य विकास करळे, पीआरओ सागर खुळे, शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# टेंभुर्णी व कुर्डूवाडी आरोग्य खात्याचा पुन्हा एकदा भोंगळ कारभार चव्हाट्यावर

**टेंभुर्णी (कटूसत्य वृत्त):-** चांदज (ता. माढा) येथे शेतातील ऊस तोडून ट्रॅक्टरमधून कारखान्याकडे नेत असताना जाब विचारणाऱ्या महिलेला कोयत्याने व लोखंडी गजाने मारहाण केल्याची घटना मंगळवारी (दि. 17) सायंकाळी ६ वाजण्याच्या सुमारास घडली. या प्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

टेंभुर्णी पोलीस ठाण्याकडून मिळालेल्या माहितीनुसार, फियार्दी सुनिता नितीन पाटील (वय 35, व्यवसाय घरकाम/शेती, रा. चांदज, ता. माढा, जि. सोलापूर) या दि. 17 फेब्रुवारी रोजी सायंकाळी 6 वाजण्याच्या सुमारास त्यांच्या शेतजमिनीतील ऊस ऊसतोड टोळीमार्फत तोडून ट्रॅक्टरमध्ये भरून कारखान्याकडे नेत असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले.

त्यावेळी गावातील बळीराम हनुमंत हेगडकर व पंढरी हनुमंत हेगडकर हे ऊस घेऊन जात असल्याचे दिसून आल्याने फिर्यादी यांनी त्यांना 'माझ्या शेतातील ऊस तोडून का नेताय?' असा जाब विचारला. यावर 'तुझ्या बापाचा ऊस आहे का?' अशी उद्दाम भाषा वापरल्याचा आरोप फिर्यादीत नमूद आहे. त्यानंतर बळीराम हेगडकर याने हातातील ऊसतोडीच्या कोयत्याने फिर्यादीच्या डाव्या पायाच्या पोटरीवर वार करून जखमी केल्याचे सांगण्यात आले आहे. तसेच पंढरी हेगडकर याने लोखंडी गजाने फिर्यादीच्या डाव्या पायाच्या नडगीवर तसेच दोन्ही पायांवर, कमरेवर व पोटावर मारहाण करून जखमी केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

दरम्यान, या वादात इतर आरोपीही सहभागी झाल्याचा आरोप आहे. शिवाजी हनुमंत हेगडकर, शंकर शिवाजी हेगडकर, नामदेव पंढरी हेगडकर, बाबुराव वसंत हेगडकर, सिता बळीराम हेगडकर व कल्पना शंकर हेगडकर (सर्व रा. चांदज, ता. माढा) यांनी फिर्यादीला शिवीगाळ व दमदाटी करून जमिनीवर हातपाय धरून आपटून लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

यावेळी फिर्यादीची मुलगी प्रांजली व फिर्यादीच्या भावाची मुलगी समीक्षा शेंडगे या घटनेचे मोबाईलमध्ये चित्रीकरण करत असताना आरोपींनी त्यांनाही शिवीगाळ केली. तसेच शंकर हेगडकर व बळीराम हेगडकर यांनी त्यांच्या जवळील मोबाईल हिसकावून जमिनीवर आदळून फोडून नुकसान केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. याशिवाय शंकर हेगडकर याने फिर्यादीची मुलगी प्रांजली हिच्या छातीवर बुक्क्याने मारहाण केल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

या घटनेप्रकरणी टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गु.र.नं. 86/2026 नुसार भा.न्या.सं. कलम 118(1), 115(2), 351(2), 352, 324(4)(5), 189(2), 191(2), 191(3), 190 प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास टेंभुर्णी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक नारायण पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ए.पी.आय. गणेश चौधरी, पोलीस हवालदार गोळे व पोलीस कॉन्स्टेबल तळेकर करीत आहेत.



### आरोग्य व्यवस्थेचा भोंगळ कारभार पुन्हा चव्हाट्यावर

दरम्यान, टेंभुर्णी परिसरातील आरोग्य व्यवस्थेचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा समोर आला आहे. काही दिवसांपूर्वी टेंभुर्णी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राने झाकले येथील ह भ प महाराज गायकवाड यांचे पोस्टमार्टम करण्यास नकार दिल्याने संबंधित मृतदेह सोलापूर येथे नेऊन पोस्टमार्टम करावे लागले होते.

त्यानंतर आता चांदज येथील मारहाणीच्या घटनेत जखमी महिलेला गुन्हा दाखल करण्यासाठी रात्री टेंभुर्णी पोलीस ठाण्यात उशिरापर्यंत थांबावे लागले. त्यानंतर तिला प्राथमिक उपचारासाठी टेंभुर्णी प्राथमिक आरोग्य केंद्रात नेण्यात आले. मात्र तात्पुरता उपचार करून तेथून पुढे कुडूर्वाडी ग्रामीण रुग्णालयात पाठवण्यात आले. कुडूर्वाडी येथून पुढे सोलापूर सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी जाण्यास चिठ्ठी दिली

मात्र टेंभुर्णी ते सोलापूर हे अंतर जवळपास १०० किलोमीटर असल्याने जखमी महिलेला वेळेत व योग्य उपचार मिळणे शक्य झाले नाही. परिणामी ती महिला उपचार न घेता अखेर घरी निघून गेल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे जखमी रुग्णाला २४ तास उपचारासाठी विविध ठिकाणी फिरावे लागणे आणि शेवटी उपचार न मिळाल्याने परत जाणे, हा प्रकार अत्यंत गंभीर असून प्रशासनाचा तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रांचा भोंगळ कारभार पुन्हा एकदा उघड झाला आहे.

परिसरातील नागरिकांना तातडीने योग्य उपचार, औषधे व सेवा मिळाव्यात, यासाठी प्रशासनाने या प्रकरणाकडे गांभीयार्ने लक्ष देण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# अनगर प्रशालेत शिवजयंती व लोकनेते बाबुराव अण्णा पाटील पुण्यतिथी साजरी

**अनगर (कटूसत्य वृत्त):-** अनगर येथील कै. शंकरराव बाजीराव पाटील माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयात शिवजयंती, लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांची पुण्यतिथी, व विद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न झाला कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राजश्री राजन पाटील या होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध वक्ते महादेव माने होते.




सर्वप्रथम छत्रपती शिवाजी महाराज व लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले प्राचार्य महादेव चोपडे यांनी कार्यक्रमाचे प्रस्तावित केले.

यावेळी बोलताना माने म्हणाले की छत्रपती शिवाजी महाराज हे लोकोत्तर पुरुष होते सर्वसामान्य कष्टकऱ्या लोकांसाठी त्यांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना केली आणि लोकांच्या मनात स्वाभिमान जागृत केला तेच काम स्वर्गीय लोकनेते बाबुराव अण्णा पाटील यांनी अनगर परिसरामध्ये केले

यावेळी नूतन नगराध्यक्ष व नूतन नगरसेवक यांचा सन्मान करण्यात आला.

विद्यार्थ्यांना आदर्श विद्यार्थी पुरस्कार, कलाश्री पुरस्कार, क्रीडा निपुण, पुरस्कार स्कॉलर पुरस्कार, बेस्ट कॅडेट्स पुरस्कार,विज्ञान प्राविण्य पुरस्कार आदी पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

यावेळी उपनगराध्यक्ष श्रीकांत घाटुळे, नारायण गुंड, सारंग गुंड, विठ्ठल कारंडे, विशाल थिटे, रूपाली शिंदे, सीमा गुंड, शीतल गायकवाड,सुरेखा डिकोळे काजल मोरे' वैशाली पाचपुंड, विजया कोकरे व एडवोकेट रवींद्र पाटील या नूतन नगरसेवकांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी संस्था संचालक भागवत शिंदे, मधुकर मारडकर, दत्तात्रय थिटे, किरण गुंड, संस्थेचे मुख्य कार्य अधिकारी चंद्रकांत ढोले, उप मुख्याध्यापक माधव खरात पर्यवेक्षक राजेंद्र डोके आदी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते सत्यवान दाढे यांनी सूत्रसंचालन केले तर राजेंद्र डोके यांनी आभार मानले.

# लाच खोरांचा सुळसुळाट, मोरोची येथील महिला ग्रामसेवक लाच स्वीकारताना अटक

**नातेपुते (कटूसत्य वृत्त):-** ठेकेदार यांनी केलेल्या कामाचे बिल व चालू कामाचे प्रलंबित बिलाची रक्कम देण्यासाठी ५ टक्के प्रमाणे दोन्ही कामाचे ४६ हजार ५०० रुपएची मागणी मोरोची ता. माळशिरस येथील ग्रामसेवक पूजा बाबासाहेब लोंढे वय ३८ वर्ष यांनी केली होती. त्यापैकी पहिला हप्ता म्हणून २६ हजार ५०० रू ठेकेदार यांच्याकडून घेताना लाच लुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट यांनी रंगेहात पकडले असल्याने माळशिरस तालुक्यात महसूल विभागात खळबळ उडाली असून सदर गुन्ह्याबाबत नातेपुते पोलीस ठाणे येथे गुन्ह्याची नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.



याबाबत पोलीस सूत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार मोरोची तालुका माळशिरस या ठिकाणी ग्रामपंचायत मध्ये आरोपी लोकसेवक पूजा बाबासाहेब लोंढे.वय ३८ वर्ष हया ग्रामपंचायत अधिकारी वर्ग ३ या पदावर त्यांची त्या ठिकाणी नेमणूक आहे. ठेकेदार यांनी केलेला कामाचे बिल काढलेचा मोबदला व चालू कामाचे प्रलंबित असलेले बिलाची रक्कम देण्यासाठी ठेकेदार यांना ५ टक्के प्रमाणे दोन्ही कामाचे एकूण ४६ हजार ५०० रुपये लाचेच्या रकमेची मागणी करून पहिला हप्ता २६ हजार ५०० रुपये देण्यास सांगितले होते. ठेकेदार यांनी सदर केलेल्या लाचच्या मागणीची तक्रार लाच लुचपत प्रतिबंधक विभाग सोलापूर युनिट या ठिकाणी केली होती. त्या अनुषंगाने बुधवार दिनांक १८ फेब्रुवारी २०२६ रोजी सोलापूर एसीबीचे अधिकारी शैलेश चंद्रकांत पवार, पोलीस हवालदार सलीम मुल्ला, स्वामीराव जाधव, महिला पोलीस हवालदार प्रियंका गायकवाड, पोलीस हवालदार राहुल गायकवाड यांनी ठेकेदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार सापळा लावून तलाटी पूजा बाबासाहेब लोंढे वय ३८ वर्ष यांना लाचेचा पहिला हप्ता २६ हजार ५०० रू ठेकेदार यांच्याकडून घेताना रंगेहात पकडले. सदरची ही कारवाई एसीबी पुणे पोलीस अध्यक्ष शिरीष सरदेशपांडे, अप्पर पोलीस अधीक्षक अजित पाटील, एसीबी सोलापूर पोलीस उपाधीक्षक प्रशांत चौगुले यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली असून सदर गुन्ह्याचा तपास एसीबी चे रवींद्र लांभाते हे करीत आहेत.

# अकलूज नगरपरिषद,अकलूज

**ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)**

**फोन - (०२१८५) २२०३५,२२५९२**

Gmail-comcakluj21@gmail.com **स्थापना दिनांक ०३-०८-२०२१**

जा.क्रं./५७१/अ.न.प./२०२६ दिनांक :-१८/०२/२०२६

## दरपत्रक सूचना

अकलूज नगरपरिषद अकलूज ता. माळशिरस जि.सोलापूर यांचे कडून योग्य त्या ठेकेदाराकडून अकलूज नगरपरिषद कार्यालयात Non DSR चे दरपत्रक मागविण्यात येत आहे. सदर कामासाठीची जाहिरात एक वेळा पेपरला प्रसिद्धी करण्यात येत आहे सदर कामाकरिता दरपत्रक दि. २०/०२/२०२६ ते २३/०२/२०२६ पर्यंत सायं.५.०० वाजे पर्यंत स्विकारण्यात येतील.

| अ.क्र. | कामाचा तपशील | सादर केलेला दर |
|---|---|---|
| १ | Entrance Arch With Small Gate<br>Total Measurement: 4.0m X 3.30m<br>Clear Opening Measurement: 3.40m X 3.0m<br>Material: MS Framing Structure, Fiber Reinforced Polymer (FRP) | |
| | Library Arch<br>Total Measurement: 4.6m X 4.0m<br>Clear Opening Measurement: 3.40m X 2.80m<br>Material: MS Framing Structure, Fiber Reinforced Polymer (FRP)<br>Animal Material: Fiber Reinforced Polymer (FRP)<br>Name Board: Acrylic | |
| | Solar Street light<br>Height: 1.5m<br>Lighting: 1500 Lumens<br>Material: Aluminum Alloy | |
| | Signage Boards Directional<br>Height: 1.2m<br>Material: MS Pipes, Aluminium Composite Panel (ACP) with 3M high-intensity reflective tape | |
| | Pergola<br>Total Measurement: 7m X 4m<br>Material: Rust-resistant aluminum | |
| | Dustbins<br>Material: Stainless Steel 316 for Higher Corrosion Resistance | |
| | Sculpture<br>Material: Fiber Reinforced Polymer (FRP) | |
| | Decorative Benches<br>Material: Mild Steel MS | |
| | Benches<br>Material: Mild Steel MS | |
| | Internal Decorative Wallpaper | |
| | Open Gym Equipments<br>1) T-Rex FTS Trainig Set Options<br>-Adjustable Step<br>-Battle Rope Achor<br>-Dual Madicine Ball target<br>-Rings<br>-Adjustable Ab Benche<br>-Top Loop Post Anchor<br>-Horizontal Ladder Bridge -Centre Post Loop with Ste<br>-Kick Plate<br>-Climber Bars<br>-Globe Grip Side Rail<br>-Climbing Rope | |
| | Material: Mild Steel (MS) Tubular posts, Cargo Net & Rope, Military Crawl Net, FRP molded figures Perforated GI sheet, Linear Low-Density Polyethylene (LLDPE)<br>Overall height: 3m 3.6m | |
| | 20' Vertical Cargo Net & Rope Climb Station | |
| | Pull Up Bar | |
| | 12' Dual Wraped Wall with Side Angle Cargo Net | |
| | Double Bar | |
| | Chin Up Bar | |
| | Ladder Bridge | |
| | Material: Mild Steel (MS) Tubular posts, Cargo Net & Rope, Military Crawl Net, FRP molded figures Perforated GI sheet, Linear Low-Density Polyethylene (LLDPE) | |
| | Kids Play Area<br>1) Multi activity Equipment<br>2) Slide with Bridge<br>3) Swing with Slide<br>4) Double Swing<br>5) Sea Saw | |
| | Material: Mild Steel (MS) Tubular posts, Cargo Net & Rope, Military Crawl Net, FRP molded figures, Perforated GI sheet, Linear Low-Density Polyethylene (LLDPE), Rotational molded UV stabilized plastic | |

अटी व शर्ती -

१) पुरवठा दर हे करासहित असावेत व G.S.T (वस्तू व सेवा कर) अधिभार विचारात घेऊन दर सादर करावे.

२) पुरवठा आदेश दिल्यानंतर त्वरित साहित्याचा पुरवठा करण्यात यावा.

३) पुरवठा दाराने आवश्यक ते नोंदणी प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

४) दिलेले दर हे स्थानिक बाजार भावाशी सुसंगत असावेत.

५) सोबत G.S.T प्रमाणपत्र जोडलेले असावे.

**सही/-**
**(सचिन पाटील)**
**मुख्याधिकारी गट अ(निवड श्रेणी)**
**अकलूज नगरपरीषद, अकलूज**